# प्रकरण पहिले

# उपोद्घात

## प्रकरण पहिले

# उपोद्‌घात

१.१ प्रास्ताविक

१.२ संशोधनविषयक निवडण्यामागील भूमिका

१.३ संशोधन पद्धती व स्वीकारावयाचे धोरण

१.४ संकल्पित प्रबंधिकेची क्रमश: मांडणी

१.५ समारोप

# प्रकरण पहिले

# उपोद्घात

## १.१ प्रास्ताविक :

इ.स. १९६० नंतरच्या काळात मराठी कादंबरीत अनेक बदल घडलेले आहेत. अनेकांनी दलित विचार कादंबरीमधून मांडलेले आहेत. दलितांचे आणि पुढारलेल्या वर्गाचे स्थान, त्यामध्ये दलितांचे असलेले स्थान ह्याविषयी लेखन होऊ लागले. अशोक व्हटकर हे त्यापैकीच एक महत्त्वाचे साहित्यिक आहेत. त्यांनी आपल्या 'मेलेलं पाणी (१९८२) व ७२ मैल' (१९८९) या दोन कादंबऱ्यामधून दलितांच्या संवेदना व्यक्त केल्या आहेत.

## १.२ संशोधनविषयक निवडण्यामागील भूमिका :

'कादंबरी' हा माझा आवडता वाड्.मय प्रकार आहे. विशेषत: मराठी साहित्यातील दलित साहित्य प्रवाहातील 'कादंबरी' हा प्रकार मला खूपच आवडतो. सामाजिक वास्तवता, समाजातील बहुविध अंगांचे दर्शन, सामाजिक समस्यांच्या मुळापर्यंत जाणारी भेदकता, स्वातंत्र्यानंतर घडून आलेली महत्त्वाची स्थित्यंतरे त्यामधील आंबेडकरी विचारधारा, धर्मांतर इ.गोष्टींचे चित्रण इतर कादंबऱ्यापेक्षा दलित कादंबऱ्यामध्ये सार्थ ठरते. म्हणूनच अशोक व्हटकर यांच्या 'मेलेलं पाणी' व '७२ मैल' ह्या दोन कादंबऱ्यावरील घटकांशी जवळीक साधणाऱ्या ठरतात. म्हणून या दोन कादंबऱ्या मी निवडल्या आहेत.

अशोक व्हटकर हाच कांदबरीकर निवडण्यामागील भूमिका अशी की, हा कादंबरीकार जन्माने दलित आहे व कातडी कमावणाऱ्या ढोर या जातीतील आहे. ह्या कादंबरीकाराचे पूर्ण नाव अशोक नामदेव व्हटकर आहे. कादंबरीकाराचे जन्मस्थळ कोल्हापूर हे आहे. त्यांचा जन्म २० ऑक्टोबर १९४७ रोजी झाला. त्यांनी कोल्हापूर येथे छ.राजाराम कॉलेजमध्ये संस्कृत विषयाचे प्राध्यापक म्हणून काम केलेले आहे. ह्या कादंबरीकाराने एकूण १८ कादंबऱ्या लिहिल्या आहेत. संशोधनासाठी निवडलेल्या 'मेलेलं पाणी' व '७२ मैल' ह्या कादंबऱ्यांमधील 'मेलेलं पाणी' ही त्यांची पहिलीच कादंबरी आहे. ती १९८२ साली प्रकाशित झाली. ह्या कादंबरीस १९८३ साली 'ह.ना.आपटे पुरस्कार' मिळाला आहे. ह्या

कादंबरीविषयी कादंबरीकाराची १९८४ साली दूरदर्शनवर मुलाखत घेण्यात आली. संशोधनासाठी निवडलेली दुसरी कादंबरी '७२ मैल' ही १९८९ साली प्रकाशित झाली. ह्या कादंबरीवर आधारित सध्या नवीन चित्रपट तयार होत आहे. त्याचबरोबर 'फॉक्सर', 'सलामी', 'क्रॅब', 'अश्वमेघ', 'विलक्षण विद्यापती', 'हव्यवाहन', 'जगज्जेता', 'ट्रॉयचे युद्ध', 'आथर्वीथ जत्र', 'अजिंक्य आंबी', 'रासपुतीन', 'गोरी बायको', 'पब्लिक', 'मंगळावरचे प्रवासी' अशा त्यांच्या अन्य कादंबऱ्या होत. असे विपुल कादंबरीलेखन असलेल्या ह्या कादंबरीकाराचा मृत्यू १६ मार्च २००१ रोजी झाला. थोडक्यात, कादंबरीकाराचे कादंबरीलेखन विपुल असूनही आजतागायत त्याच्या कादंबरीवर संशोधन झालेले नाही. म्हणून त्यांच्या 'मेलेलं पाणी' व '७२ मैल' ह्या दोन कादंबऱ्या मी निवडल्या.

'मेलेलं पाणी' ह्या कादंबरीमध्ये ढोर समाजाचे चित्रण करण्यात कादंबरीकार कमालीचा यशस्वी ठरला आहे. संपूर्णमध्ये उपेक्षित असा ढोर समाज हा कातडी कमावण्याचा व्यवसाय करणारा असा आहे. खेड्यापाडयातील जातीयवाद, राजकारण, अज्ञान इ.चा परिणाम होत जाऊन हा समाज लोकशाहीत हतबल झाला आहे, हे कादंबरीकाराने आपल्यासमोर यथार्थ शब्दात व्यक्त केले आहे. 'मेलेलं पाणी' हे नाव कादंबरीकाराने एवढ्याचसाठी दिलेले आहे की, ज्याप्रकारे धरणामध्ये काही ठराविक पातळीपर्यंत पाणी साचून राहते ते सोडता येत नाही. त्याप्रकारे ढोर, चर्मकार, मातंग आणि महार ह्या जातीबद्दलची अस्पृश्यतेची भावना ही इतर सवर्ण जातीतील लोकांच्या मनात साचून राहते. ती जाऊ शकत नाही, ती त्या पाण्यासारखीच प्रत्येकाच्या मनात साचून राहते, हे सांगण्याचा प्रयत्न कादंबरीकाराने शीर्षकाच्या माध्यमातून केलेला आहे. 'मेलेलं पाणी' ह्या कादंबरीमध्ये ढोर समाजातील यल्लाप्पा नावाच्या अशिक्षित आणि बापू नावाच्या शिक्षित तरुणाचे चित्रण कांदबरीकाराने केलेले आहे. यल्लापासारखी माणसे व्यवस्थेला बळी पडतातच. त्याचबरोबर बापूसारख्या शिक्षित तरुणाच्या वाट्यालासुद्धा ही जातीव्यवस्था येते. कारण तो सुशिक्षित असला, तरी जातीने ढोर आहे. तो या व्यवस्थेविरुद्ध लढण्यास तयार होतो. त्याला त्या गावात असणाऱ्या गुरुजींची मदत होते. पण गावातील ही समस्या सोडविण्यास ते अपुरे ठरतात. अस्पृश्य जातीमधील जातीय उतरंड कशी असते, ढोर,

चर्मकार, मातंग, महार ह्या जातीमध्येदेखील जातीयतेच्या भावनांची घर कसे केले आहे, त्यांच्यामध्येदेखील एक जात दुसऱ्या जातीस कशी कमी लेखते, ह्याचे चित्रण कादंबरीकाराने ह्या कादंबरीत केलेले आहे.

'७२ मैल' ह्या कादंबरीतील कादंबरीकाराला बालपणी सातारा ते कोल्हापूर ह्या तीन दिवसाच्या प्रवासात त्याच्या आईच्या वयाला शोभेल, अशी स्त्री भेटते. कादंबरीकाराचे बालमन तिला आई मानते. तिचे नाव राधाक्का असते. राधाक्काच्या निमित्ताने कादंबरीकाराला जगाचे, जीवनाचे जे विदारक दर्शन घडले. त्याचा मन थरकावून टाकणारा अनुभव म्हणजे '७२ मैल' ही कादंबरी होय, न पुसणारा ठसा त्यावेळच्या घटनांनी कादंबरीकाराच्या मनावर उमटविला, त्याचे हे प्रकटरुप होय. राधाक्काच्या सोबतीने तिची सहा मुले प्रवास करीत असतात. त्यापैकी तीन मुलांचा वाटेतच मृत्यू होतो. त्यातही तिचा जो थोरला मुलगा असतो, तो राणोजी हा नागीण चावल्याने मृत्युमुखी पडतो. राणूचा झालेला भयानक मृत्यू हा तर तिच्या दु:खाचा परमावधी आहे. तीन दिवसांच्या प्रवासात, किंबहुना आयुष्यभर जे प्रसंग राधाक्कावर कोसळले, ते जीवनाच्या क्षणभंगुरत्वाची जाणीव करुन देणारे आहेत आणि शेवटी तर मुलांच्या भुकेपायी मूठभर शेवेसाठी स्वत:चे शील फेकणाऱ्या राधाक्काचे कोसळण्याचे वर्णन कादंबरीकाराने केलेले आहे. वाचकांना अंतर्मुख करण्याची ताकद ह्या कादंबरीतील अनुभवांमध्ये आहे. घडणाऱ्या घटनांनी आपणही चक्रावून जातो. राधाक्काच्या दु:खाची जखम वाचकांना बरेच दिवस आठवत राहील, हेच ह्या कादंबरीचे बलस्थान होय.

## १.३ संशोधन पद्धती व स्वीकारावयाचे धोरण :

'अशोक व्हटकर यांचे कादंबरीलेखन' हा विषय अभ्यासताना मी प्रामुख्याने समाजशास्त्रीय संशोधनपद्धतीचा अवलंब करणार आहे. समाजशास्त्रीय संशोधन पद्धतीचा अवलंब करणार आहे. समाजशास्त्रीय संशोधन पद्धतीचा अवलंब केल्यामुळे अशोक व्हटकर ह्यांच्या कादंबरीमधील सामाजिक वास्तव आणि त्या वास्तवमागील कारणे समजतील. साहित्य हे सामाजिक बांधिलकी मानणारे असल्यामुळे समाजात होणारे बदल साहित्यामध्ये येणे अपरिहार्य असते. ते बदल 'मेलेलं पाणी' (१९८२) व '७२ मैल' (१९८९) ह्या दोन

कादंबऱ्यामधून आपल्याला निश्चित दिसून येतात. अशोक व्हटकर ह्यांच्या कादंबरीलेखनाचा अभ्यास करताना मी समकालीन कादंबरीकाराचा संदर्भही पाहणार आहे.

## १.४ संकल्पित प्रबंधिकेची क्रमश: मांडणी :

१. उपोद्घात

२. मराठी कादंबरीवाङ्.मयाची वाटचाल आणि तिच्यातील दलित कादंबरीकारांचे योगदान

३. अशोक व्हटकर ह्यांच्या कादंबऱ्यांमधील अनुभवविश्व.

४. अशोक व्हटकर ह्यांच्या कादंबऱ्यांमधील व्यक्तिरेखा.

५. अशोक व्हटकर ह्यांच्या कादंबऱ्यांमधील वातावरणनिर्मिती व भाषाशैली.

६. अशोक व्हटकर ह्यांचे मराठी कादंबरीवाङ्.मयातील स्थान.

७. उपसंहार

८. परिशिष्टे
    १. अशोक व्हटकर ह्यांचे छायाचित्र
    २. अशोक व्हटकर : जीवनपरिचय

९. संदर्भसूची
    १. साधनसूची
    २. सहाय्यक सूची

## १.५ समारोप :

अशाप्रकारे पस्तुत प्रबंधिकेत सात प्रकरणांमधून अशोक व्हटकर लिखीत 'मेलेलं पाणी' व '७२ मैल' ह्या दोन कादंबऱ्यांच्या चिकित्सक अभ्यासाच्या आधारे ह्यांचे कादंबरीलेखन आपण जाणून घेणार आहोत.